**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक ०१/०३/२०२४**

आरोपी लोकसेवक- 1) श्री. छगन उत्तमराव पाटील, वय 49 वर्षे, पद- सह दुय्यम निबंधक वर्ग-2 सिल्लोड, ता. सिल्लोड जिल्हा-छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) 2) खाजगी इसम- भिमराव किसन खरात, वय 58 वर्षे, व्यवसाय-स्टॅप वेंडर प्लॉट नं.40 जय भवानी नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 5000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | 1) श्री. छगन उत्तमराव पाटील, वय 49 वर्षे, पद- सह दुय्यम निबंधक वर्ग-2 सिल्लोड, ता. सिल्लोड जिल्हा-छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3)<br>2) खाजगी इसम- भिमराव किसन खरात, वय 58 वर्षे, व्यवसाय-स्टॅप वेंडर प्लॉट नं.40 जय भवानी नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/-रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 5000/- रुपये |
| सापळा अधिकारी | :- | श्री. सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार व त्यांची भावजई यांचे सामाईक नावे असलेल्या गट क्रं. 47/1 धावडा शिवार ता. सिल्लोड चे दस्त तक्रारदार यांची पत्नी यांच्या नावे करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार व त्यांची भावजई यांचे सामाईक नावे असलेल्या गट क्रं. 47/1 धावडा शिवार ता. सिल्लोड चे दस्त तक्रारदार यांची पत्नी यांच्या नावे करण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. छगन पाटील 2. खाजगी ईसम भिमराव खरात यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 27/02/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 5000/- रुपये लाचेची मागणी केली बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आज दि. 01/03/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. छगन पाटील व खाजगी ईसम भिमराव खरात यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष रुपये 5000/- लाचेची मागणी करुन खाजगी ईसम भिमराव खरात यांनी रुपये 5000/- लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह दोनही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन सिल्लोड शहर, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, पो.अ.केवलसिंग घुसिंगे, चालक पो.अं.सी.एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अँटी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.